# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी अकोला यांचे कार्यालय, अकोला

दूरध्वनी क्र. 0724-2424442 फॅक्स 0724-2435007

email address -rdc_akola@rediffmail.com web address :www.akolanic.in


क्र.कक्ष2/गृह/प्र.स./कावि 81 /2020 दिनांकः 18 / 03 /2020

## आदेश

वाचा -

१. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. करोना-२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ सार्वजनिक आरोग्य विभाग,मंत्रालय मुंबई दिनांक १४ मार्च, २०२०

२. साथरोग अधिनियम,१८९७

३. सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई यांची अधिसूचना दिनांक १४ मार्च २०२०

४. या कार्यालयाचे आदेश दिनांक १५.३.२०२०

जिल्हादंडाधिकारी सत्यमेव जयते अकोला

**ज्या अर्थी**, शासनाने करोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ लागू करण्यात आला आहे व दिनांक १४ मार्च २०२० रोजी अधिसूचना निर्गमित केली आहे. करोना विषाणूचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायोजनेचा एक भाग म्हणून नागरीकांची होणारी गर्दी टाळण्यासाठी राज्यातील चित्रपटगृहे, तरणतलाव, व्यायामशाळा, नाटयगृहे पुढील आदेशा होईपर्यंत बंद ठेवण्याबाबत सूचित करण्यात आले आहे.

**त्या अर्थी**, सध्या देशात आणि राज्यात कोरोना (कोव्हीड १९) चा फैलाव होण्याची शक्यता नाकारता येत नाही, त्यामूळेसर्व सामान्य नागरीकांच्या जिवीतास धोका निर्माण झाल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. या दृष्टीकोनातून प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी अकोला जिल्हयातील चित्रपटगृहे, तरणतलाव, व्यायामशाळा, नाटयगृहे पुढील आदेशापर्यंत बंद करणे आवश्यक असल्याची माझी खात्री झाली असल्यामुळे जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण अकोला, **आपत्ती व्यवस्थापन कायदा- २००५** व **मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ४३ अन्वये** उपाययोजना करणे आवश्यक असल्याने तसेच **साथरोग अधिनियम १८९७ मधील खंड २,३ व ४** मधील तरतूदीनुसार मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानूसार मी,**जितेन्द्र पापळकर, भाप्रसे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी , अकोला** , याद्वारे कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपायोजनेचा एक भाग म्हणून नागरीकांची होणारी गर्दी टाळण्यासाठी अकोला जिल्हयातील **करमणूक कर केन्द्रे , व्हीडीओ सेंटर, व्हीडीओ पार्लर, पुल गेम, व्हीडीओ सिनेमा व मनोरंजन केन्द्रे** पुढील आदेशापर्यंत बंद ठेवण्याबाबतचे आदेश पारीत करीत आहे.

..2..

Nitin 21

या आदेशाद्वारे विहीत करण्यात आलेल्या कोणत्याही निर्बंधांची किंवा, काढलेल्या आदेशाची अवज्ञा करणा-या कोणत्याही व्यक्तीने, **भारतीय दंड संहिता, (१८६० चा ४५ ) याच्या कलम १८८** अन्वये शिक्षापात्र असलेला अपराध केला आहे असे मानन्यात येईल.

सदर आदेश आज **दिनांक 18 मार्च 2020** रोजी माझे स्वाक्षरी व शिक्यानिशी निर्गमित करण्यात येत आहे.

सदर आदेशाची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरीता उपविभागीय अधिकारी यांनी आपले कार्यक्षेत्रात वरील आदेशात नमुद केल्याप्रमाणे दक्ष राहावे. आदेशाचे उल्लंघन केल्यास **भारतीय दंड संहिता, (१८६० चा ४५ ) याच्या कलम १८८** नुसार संबधितांवर कारवाई करुन अहवाल सादर करावा.

जिल्हादंडाधिकारी सत्यमेव जयते अकोला

**(जितेंद्र पापळकर,** भा.प्र.से.**)**
**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**
**अकोला**

**प्रतिलिपी -**

१. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई
२. उपसचिव, महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभाग मंत्रालय मुंबई
३. मा. आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती

i. यांना माहिती करिता सादर

४. जिल्हा पोलीस अधिक्षक, अकोला
५. आयुक्त, अकोला महानर पालिका अकोला यांनी आपले कार्यक्षेत्रात या आदेशाचे तंतोतंत पालन करुन प्रभावीपणे अंमलबजावणी करुन अहवाल या कार्यालयास सादर करावा.
६. उपविभागीय अधिकारी------------------------------- सर्व. यांनी आपले स्तरावरुन सदर आदेशाची अंमलबजावणी करुन अहवाल या कार्यालयास सादर करावा.
७. तहसिलदार / सहा. करमणूक कर अधिकारी -------------------------------------- सर्व. आपले कार्यक्षेत्रात या आदेशाचे तंतोतंत पालन करुन प्रभावीपणे अंमलबजावणी करुन अहवाल या कार्यालयास सादर करावा.
८. व्यवस्थापक /मालक/ प्रोपरायटर ------------------------------------------------ यांना माहिती तथा उचित कार्यवाही करिता.

**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**
**अकोला**